# चैत्रधून २०२० - उज्ज्वल भविष्याची ग्वाही

- **मृणाल बुजोणे** (महाराष्ट्र मंडळ बे एरिया)

जागतिक संकटाच्या सावटाचे बंधन झुगारून, सळसळत्या उत्साहात, उज्ज्वल भविष्याची जणू ग्वाही देत, अमेरिका आणि कॅनडा येथील पंधराहून अधिक राज्यांमधून जवळजवळ २०० हरहुन्नरी संगीत साधकांनी साजरा केलेला उत्सव, म्हणजेच, महाराष्ट्र मंडळ बे एरियाची चैत्रधून २०२० ही संगीत स्पर्धा.

गेल्या २० वर्षांपासुन चालत आलेली ही स्पर्धा यावर्षी कोरोनाच्या संकटामुळे रद्द होते की काय अशी शंका वाटत असतानाच, महाराष्ट्र मंडळ बे एरिया ने या संकटाचे सुवर्णसंधी मध्ये रूपांतर करून ही स्पर्धा देशव्यापी केली. आणि त्याला हिऱ्यांची झालर लाभली ती अतिशय दिग्गज, प्रथितयश आणि आपल्या क्षेत्रात उत्तुंग नाव कमावलेल्या परीक्षकांमुळे. या स्पर्धेसाठी विदुषी श्रीमती आशाताई खाडिलकर, पं. श्री. रघुनंदन पणशीकर, जेष्ठ गायक श्री. रवींद्र साठे, नव्या पिढीचे संगीतकार श्री. कौशल इनामदार, पं. श्री. भरत कामत, पं. श्री रामदास पळसुले, हार्मोनियम वादक श्री. मिलिंद कुलकर्णी आणि संतूर वादक डॉ. श्री. धनंजय दैठणकर या सर्वांनी मोठ्या जबाबदारीने आणि रत्नपारखी नजरेने परीक्षण केले. खरे तर परीक्षकांची नावे आणि स्पर्धकांची संख्या या दोनच गोष्टी या स्पर्धेची यशोगाथा सांगायला पुरेशा आहेत. परंतु एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते ती म्हणजे ही स्पर्धा "Online" घेण्याचा हा मंडळाचा पहिलाच अनुभव त्यामुळे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अविरत मेहनत घेत, स्पर्धकांच्या आणि परीक्षकांच्या तांत्रिक अडचणी सोडवत, त्यांना प्रत्येक पायरीवर सहकार्य व मार्गदर्शन करत सगळ्या प्रवासाचा अगदी सुखद आणि परिपूर्ण असा अनुभव दिला.

हिंदुस्तानी शास्त्रीय गायन, शास्त्रीय तबला वादन, शास्त्रीय सूरवाद्य, मराठी सुगम संगीत अशा विविध विभागात बालकांपासून ते जेष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील संगीत साधकांनी यात भाग घेतला होता. बरं, स्पर्धेसाठी प्रवेशिका आल्या, परीक्षकांनी निकालही तयार केला. परंतु महाराष्ट्र मंडळ बे एरियाचे सर्जनशील कार्यकर्ते काही फक्त Facebook posts किंवा Website अश्या पारंपरिक माध्यमातून निकाल जाहीर करून थांबणार नव्हते. निकाल जाहीर करण्यासाठी एका भव्य online कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्व परीक्षक, सर्व स्पर्धक आणि त्यांचे परिवारजन या सर्वांसह बक्षीस समारंभाचा अतिशय देखणा सोहळा पार पडला. परीक्षक भारतातून तर स्पर्धक उत्तर अमेरिकेतील १५ राज्यांमधून सहभागी होणार असल्यामुळे time zone चे गणित बसवणे हा मोठ्ठा उपक्रम होता. पुन्हा एवढ्या मोठ्या संख्येसाठी online सोहळ्याचा अनुभव आनंददायी होणेही अतिशय महत्त्वाचे होते. पण एकदा ठरले की मग सगळ्या अडचणींवर उपाय सापडत जातात. अशीच मजल दरमजल करत २४ मे या दिवशी अतिशय दिमाखात चैत्रधून २०२० चा बक्षीस समारंभ पार पाडला.

विदुषी श्रीमती आशाताई खाडिलकर आपला अनुभव सांगताना म्हणाल्या की “सर्व स्पर्धकांना सूर, लय, ताल, गाण्यातील भाव आणि अचूक शब्दोच्चार यांचे सखोल ज्ञान आहे. त्यांच्या गुरूंनी आणि पालकांनी घेतलेली मेहनत प्रत्येक कलाकृतीतून दिसून आली आणि त्यासाठी सर्व गुरूंचे आणि पालकांचे त्यांनी विशेष कौतुक केले.”

पं. श्री. रघुनंदन पणशीकर यांना मुलांची गाण्यातली समज तर भावलीच पण त्याचबरोबर त्यांना मुलांची निरागसताही अतिशय आवडली. सर्व स्पर्धकांनी अगदी मनापासून आणि कुणाचीही नक्कल न करता गाणी गायली याचा त्यांनी विशेष उल्लेख केला. संगीत हे माणसाला निरागसतेकडे नेणारे असावे असे ते म्हणाले.

श्री. मिलिंद कुलकर्णी म्हणाले की स्पर्धकांचे video असल्यामुळे पुन्हा पुन्हा ऐकायला मिळाले आणि निकाल देताना त्याची खूप मदत झाली. काही स्पर्धकांचे video निव्वळ आनंदासाठी पुन्हा पुन्हा ऐकले गेले.

डॉ. श्री. धनंजय दैठणकर म्हणाले की सर्वांनीच कमी वेळात आपली कला जास्तीत जास्त खुलवून दाखवण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे.

पं. श्री. रामदास पळसुले अतिशय आनंदाने म्हणाले "अमेरिकेत राहणारी मुले भाग्यवान आहेत कारण भारतीय अभिजात संगीतात मोलाचे योगदान देणारे अनेक दिग्गज कलाकार एकतर तेथे वास्तव्यास आहेत किंवा ते वारंवार येत असतात. त्यामुळे भारतात राहून जी संधी मिळणे अतिशय दुर्लभ आहे अशी संधी अमेरिकेतील मुलांना उपलब्ध होऊ शकते. तेव्हा सर्वांनी या संधीचं सोनं करावं."

जेष्ठ गायक श्री. रवींद्र साठे हे गायक आणि कौशल इनामदार हे संगीतकार अशी परीक्षक द्वयी असल्यामुळे प्रत्येक गाण्याचा गायक आणि संगीतकार या दोघांच्या दृष्टिकोनातून विचार केला गेला. कौशल इनामदार आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की "जेव्हा स्पर्धा इतकी उत्तम होते तेव्हा परीक्षण खूप गांभीर्याने आणि प्रत्येक स्पर्धकाचा विविध पैलूंनी विचार करूनच करावे लागते. सगळ्यात महत्वाचं म्हणजे गाणं हे impress करण्यासाठी नसून express करण्यासाठी आहे हे कळलं पाहिजे."

सर्वच परीक्षकांनी स्पर्धेच्या आयोजनातील सुसूत्रता, सकारात्मक ऊर्जा आणि प्रत्येक वेळी मंडळाच्या कार्यकर्त्यांची सहज उपलब्धता यासाठी एकमताने आणि एकसुरात महाराष्ट्र मंडळाचे मनापासून कौतुक केले.

ही संधी आपापल्या सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाबरोबरच अनेक महाराष्ट्र मंडळांनी मोलाचे सहकार्य केले. सर्वांचे सहकार्य, स्पर्धक आणि पालकांचा उत्साह, माननीय परीक्षकांचे आशीर्वाद आणि महाराष्ट्र मंडळ बे एरियाच्या कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम यामुळेच या स्पर्धेला एक वेगळी उंची प्राप्त झाली.

स्पर्धेतील विजेते: https://www.facebook.com/mmbayarea/posts/3904897322885473

सर्व स्पर्धकांचे विडिओ: https://www.youtube.com/channel/UCMFuCUWWxCuD_ePmT9LhDpA/playlists

***